maharashtratimes.com | www.mtonline.in

मुंबईचे नं.१ मराठी वृत्तपत्र

महाराष्ट्र टाइम्स

नोंदणी क्र. एमसीएस/०६३/२०१५-१७. आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ९२४९/६२.

मुंबई । मंगळवार, २२ मार्च २०१६ । पाने १२ + मुंबई टाइम्स । शहर आवृत्ती * । ₹ ४.०० किंवा ७.०० द टाइम्स ऑफ इंडियासहित



# आगळी वेगळी 'घरवापसी'!


**स्क्रिझोफ्रेनिया झालेल्या रुग्णांना अनेकदा ना घरच्यांचा आधार मिळत, ना समाजाचा. अन्न, ठिकाणाच्या शोधामध्येही मंडळी दारोदार, रस्त्यांवर भटकत असतात. अशा मंडळींना आधार देण्याचे काम श्रद्धा पुनर्वसन केंद्र गेली ११ वर्षे करत आहे. डॉ. भरत व डॉ. स्मिता वाटवानी या केंद्राच्या माध्यमातून करत असलेल्या रुग्णसेवेविषयी...**

■ डॉ. शुभा थत्ते

ही राजकारणातली 'घरवापसी' नव्हे तर गंभीर मानसिक आजारामुळे घरदाराला मुकलेल्या रुग्णांना त्यांच्या मुलामाणसांकडे पोहोचविणे, हे विस्मयजनक काम करत आहेत डॉ. भरत व डॉ. स्मिता वाटवानी. हे सायकॅट्रिस्ट जोडपे. तेही गेली तब्बल ११ वर्षे! त्यापूर्वी १९८८ साली त्यांनी दहिसर येथे कामाला सुरुवात केली होती पण. नंतर २००४ साली रुग्णसेवेत आयुष्य घालवलेल्या बाबा आमटे यांच्याशी चर्चा करून त्यांच्या आशीर्वादाने कर्जत येथे काम सुरू केले. आपण रस्त्यावर भटकणारी, केसांच्या जटा झालेली, फाटकेतुटके कपडे घातलेली तर काही वेळा ठार नागडी असणारी, कचरा विचकून खाण्यासाठी काही मिळेल का, हे शोधत असणारी माणसे पहातो . बहुतांशी लोक नाकाला रुमाल लावून, कपाळाला आठ्या घालून दूर होतात. पण त्या माणसांना त्याचे काही भानही नसते. कारण ती त्यांच्या जगातच वावरत असतात. स्किझोफ्रेनिया या गंभीर आजारामुळे व त्यावर औषधोपचार न झाल्यामुळे छिन्नविछिन्न झालेल्या या व्यक्ती असतात. त्यांनाही जवळची मायेची माणसे, आईबाप, भावंडे असतात. पण, आजारामुळे भान न राहून दिसेल त्या वाहनात बसून घरापासून दूर भटकत जातात, कोणी दिले तर खातात, नाहीतर कचराकुंड्यांत शोधतात. अशा माणसांची कोणी माहिती दिल्यास श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी, स्वयंसेवक येऊन त्याच्या व्हॅनमध्ये घालून कर्जत येथील त्यांच्या केंद्रावर घेऊन जातात. त्यांची स्वच्छता करून औषधे सुरू करतात. साधारण महिन्याने तो माणसात आला की त्यांच्याकडे काम करणारे सोशल वर्कमध्ये पदवी असणारे कर्मचारी त्याचा पत्ता शोधून पत्रव्यवहार करतात व स्वखर्चाने त्याला त्याच्या घरी पोचवितात. हे सगळे प्रयत्न खरोखर थक्क करणारे आहेत. हे सर्व एवढ्यावरच थांबत नाही तर त्या गावातील माणसांना एकत्र करून चित्राद्वारे हा कसा आजार आहे व तो औषधाने आटोक्यात येऊ शकतो, हा महत्त्वाचा संदेश दिला जातो. भारतातील आरोग्यव्यवस्था इतकी प्राथमिक अवस्थेत आहे की







अशा रुग्णांना उपचारासाठी कित्येक ठिकाणी जवळजवळ १०० किमीपर्यंत मदत उपलब्ध नसते. या आजाराचे प्रामाण १ टक्का इतके आहे म्हणजे भारताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात किती रुग्ण असतील, याची कल्पना करा आणि त्याबद्दल इतकी अनास्था! कित्येक गावांमध्ये असा काही आजार असतो, याची जाणिवही नसते. त्यामुळे आजाराला सुरुवात होऊन ती व्यक्ती विचित्रपणे वागू लागली की इतर बुवा, जादूटोणा उपायांना सुरुवात होते व त्यामुळे फरक न पडल्याने त्याला वाळीत टाकल्यासारखेच केले जाते. अशीच ही माणसे घरापासून दूर भटकत रहातात. श्रद्धा पुनर्वसन केंद्राकडून रुग्णाच्या घरच्या मंडळींना गोळ्या कशा द्यायच्या, हेही शिकवले जाते. घर सोडल्यापासून त्याच्यात झालेला लक्षवेधक बदल दिसत असल्याने घरची माणसे औषधांच्या बाबतीत जागरूक रहातात. पुढील २ वर्षे त्या रुग्णांचे औषधांचे पार्सल दर दोन महिन्यांनी नियमितपणे येत रहाते व रुग्णात होणारा बदल सातत्याने दिसत असल्याने हा आजार आटोक्यात येऊ शकतो, यावरचा कुटुंबाचाच नव्हे तर गावाचा विश्वास वाढतो. मानसिक आरोग्य क्षेत्रामधली ही किती भरीव कामगिरी व तीही कोणताही गाजावाजा न करता, बडेजाव न मिरवता!

कर्जत येथील या पुनर्वसन केंद्राला भेट देताना जी गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे तेथील कार्यकर्त्यांची कामाची बांधिलकी! अतिशय तुटपुंज्या मदतीवर चालणाऱ्या या केंद्रामध्ये २४ सोशल वर्कची पदवी असणारे कार्यकर्ते आहेत. ते जाणिवपूर्वक वेगवेगळ्या प्रांतातील आहेत, ज्यायोगे रुग्णांना त्यांच्या घरी पोहोचवताना मदत होते. त्याशिवाय २० जणांची टीम, २ निवासी डॉक्टर व ७/८ रुग्ण असे आहेत की त्यांच्या कुटुंबाचा शोध न लागल्याने किंवा त्यांनी स्वीकार करण्यास नकार दिल्याने त्यांना तिथे सामावून घेतले आहे. ते इतर कामांमध्ये मदत करतात. एकावेळी तिथे सुमारे ३० ते ४० स्त्रिया व ८०ते १०० पुरुष असतात. त्यांना वेळच्यावेळी औषधे देणे, नाश्ता, जेवण, स्वच्छतेकडे व सुरक्षिततेकडे लक्ष ठेवणे या सर्व गोष्टी येथील कर्मचारी मोठ्या मायेने करतात. स्वत: डॉ. भरत त्यांच्या बोरीवलीच्या घर व हॉस्पिटल येथून आठवड्यातून २ वेळा केंद्रात जाऊन रुग्णांना तपासतात व घरी पाठवण्याजोगे झाले आहेत का ते ठरवतात. तेथे भाजीपाला लावला आहे व २५ गायीही ठेवलेल्या आहेत कारण येणारे बहुसंख्य रुग्ण अगदी लहान खेडेगावातील असल्याने त्यांना या कामाची माहिती व त्यात रस असतो व ते ही कामे करू लागतात. आम्ही गेलो त्या दिवशी ३ रुग्ण आपापल्या गावी परतणार होते. संस्थेचे काम माहीत असल्याने लोक रस्त्यावर हिंडणारी अशी व्यक्ती दिसल्यास फोन करून कळवितात. पण आपणहून मनाने अशा कामासाठी कोणी पैसे किंवा वस्तूरूपाने मदत करत नाही. त्यांचा तिथे असतानाचा खर्च व नंतर २ वर्षांची औषधे याबद्दल डॉ. भरत यांना विचारता ते म्हणाले, घरवापसीच्यावेळी त्यांच्या कुटुंबाचा मिळणारा दुवा हीच मिळकत. कारण बहुतेक सर्व कुटुंबांकडे त्याचे पोट भरण्याइतकीही साधने नसतात. गेल्या ९ वर्षांत श्रद्धा पुनर्वसन केंद्राने सुमारे ५००० स्त्रीपुरुषांना आपल्या माणसांकडे पोहोचविले आहे. या ५००० लोकांमधील बहुसंख्य अगदी लहान गावांमधून आलेली व भारताच्या सर्व प्रांतातून आलेली दिसली. अगदी झारखंड, ओरिसा, बांगलादेश व १ इराणचाही! तेथे खरी आंतरभारती होती. टाटा पॉवर, सेल ( Steel Authority of India Ltd. ) यासारख्या काही कंपनी, मंडळींनी व तेथील निवासी जागा बांधण्यासाठी काही दानशूर लोकांनी देणगी दिलेली दिसली. पण एकंदर सर्व व्यवस्था एखाद्या आश्रमासारखी, केवळ गरजा भागण्यापुरता खर्च अशी दिसली. कायमस्वरूपी राहण्यासाठी स्किझोफ्रेनिक रुग्णांसाठी काही बांधण्याचा विचार आहे का, हे विचारताच डॉ. भरत म्हणाले की शारीरिक व्यंगाच्या व्यक्तीला कुटुंब घरातच आसरा देते ना? मग मानसिक आजार असलेल्या मंडळींचा योग्य तो सांभाळ करणे ही त्या कुटुंबाची व आजुबाजूच्या समाजाची जबाबदारी आहे. कारण सध्या उपलब्ध असलेल्या औषधांनी आजार बराच आटोक्यात येतो. समाजापासून त्यांना दूर ठेवले तर मध्ययुगातील मनोरुग्णालयांपासून आपण काय प्रगती केली ?

असा हा आगळावेगळा सेवाभावी आश्रम. एकदा जरूर जाऊन पहाण्यासारखा व आपल्यापरीने होईल तितकी मदत करण्याजोगा. (देवस्थानांना देणगी देण्यापेक्षा खचितच) कारण हे खरे सत्पात्री दान होईल.

**संस्थेबद्दल अधिक माहितीसाठी वेबसाइट :** www.shraddharehabilitationfoundation.org